# प्रेमाचा गुलकंद

- आचार्य प्र. के. अत्रे

आचार्य अत्रे हे नाव अगदी अलीकडची पिढी सोडली तर मराठी साहित्यातील अत्यंत लोकप्रिय असे होते, आजही आहे. अत्रे हे उत्तम लेखक, कवी, पत्रकार, राजकारणी, समीक्षक, वक्ता, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, संपादक असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. शिवाय माणूस म्हणूनही ते विद्वान, व्यासंगी, रसिक, उमदे आणि दिलदार स्वभावाचे होते. लेखनाच्या प्रांतात लघुनिबंध, लेख, कथा, कादंबरी, नाटके, पटकथा अशी सर्व क्षेत्रात त्यांनी आपली लेखणी गाजवली आहे. आपल्या तुफान विनोदी, हजरजबाबी, मुद्देसूद, रंजक बोलण्याने त्यांनी अक्षरश: शेकडो सभा जिंकल्या. 'घराबाहेर', 'लग्नाची बेडी', 'साष्टांग नमस्कार' ही त्यांची नाटके महाराष्ट्राने डोक्यावर घेतली. काव्य या क्षेत्रातही अत्रे प्रचंड गाजले; ते त्यांच्या 'विडंबन' या काव्यप्रकारामुळे.

स. ग. मालशे यांनी विडंबनाची फार सुंदर व्याख्या केली आहे. ते म्हणतात, ''विडंबन म्हणजे वाङ्मयीन वेडावणेच (वेडावून दाखवणे) म्हणा ना !'' माणसाचा स्वभाव तसा नकला करण्याचा असतो. माणूस शिकतो, तोच मुळी अनुकरणातून, त्यामुळे नक्कल करणे हे त्याच्या मूळ प्रकृतीतच दडलेले आहे. एखाद्या आवडलेल्या तशाच नावडलेल्या गोष्टीचीही तो नक्कल करतो. मुले ही नक्कल गंमत म्हणून करतात; तर मोठी माणसे काही हेतूने करतात. मनोरंजन हा एक हेतू आहेच. शिवाय त्यातून त्याला काहीतरी संदेश पोचवायचा असतो. हा संदेश जसा त्या मूळ कलाकृतीच्या वा मताच्या कर्त्याला असतो, त्याचप्रमाणे तो समाजालाही असतो. हे विडंबन या साहित्य प्रकाराचे फार मोठे मौलिक कार्य आहे. उदाहरणच द्यायचे झाल्यास अत्र्यांचे साष्टांग नमस्कार हे नाटक माणसाच्या कोणत्या ना कोणत्या अतिरेकी मतावर, सवयीवर भाष्य करते. व्यायामाची सवय केव्हाही चांगली पण तिचा अतिरेक वाईटच. कविता करणे चांगले परंतु केव्हाही, कशीही कविता टाकत राहणे हा अतिरेकच. अशा अतिरेकांची शिकार झालेली पात्रे त्या नाटकात अत्र्यांनी रंगवली आहेत.

अत्र्यांच्या विडंबनापर कविता हा मराठी साहित्याला एक खुसखुशीत मेवा आहे. 'झेंडूची फुले' हा त्यांचा काव्यसंग्रह म्हणजे विडंबनपर कवितांचा एक छानदार रंगीबेरंगी पुष्पगुच्छच आहे. हा गुच्छ झेंडूच्या फुलांसारखाच गेंदेदार, रसरसलेला आणि मोहक आहे. सुंदर सुवाद नसला तरी चित्ताकर्षक नक्कीच आहे. निरनिराळ्या कविंनी केलेल्या काही विशिष्ट रचनांवर अत्र्यांनी यात विडंबनात्मक कविता लिहिलेल्या आहेत. यातील 'प्रेमाचा गुलकंद' ही कविता येथे सादर करीत आहे.

बागेतूनी वा बाजारातूनी कुठुनि तरी 'त्या'ने
गुलाबपुष्पे आणूनि द्यावित 'तिज'ला नियमाने ।
गुलाब कसले प्रेमपत्रिका लालगुलाबी त्या !
लाल अक्षरे जणु लिहिलेल्या पाठपोट नुसत्या !
प्रेमदेवता प्रसन्न होई या नैवेद्याने !
प्रेमाचे हे मार्ग गुलाबी जाणती नवतरणे !
कधी न त्याचा ती अवमानी फुलता नजराणा !
परी न सोडिला तिने कधीही अपुला मुग्धपणा !
या मौनातच त्यास वाटले अर्थ असे खोल !

तोही कशाला प्रगट करी मग मनातले बोल
अशा तऱ्हेने मास लोटले पुरेपूर सात,
खंड न पडला कधीही त्याच्या नाजूक रतिबात
धडा मनाचा करून शेवटी म्हणे तिला, ''देवी !''
दुजी आणखी विशेषणे तिज गोंडस तो लावी
''बांधित आलो पूजा मी तव आजवरी रोज,
तरी न उमगशी अजूनि कसे तू भक्ताचे काज ?
गेंद गुलाबी मुसमुसणारे तुला अर्पिलेले
सांग तरी सुंदरी, फुकट का ते सगळे गेले ?
तोच ओरडूनि त्यास म्हणे ती, ''आळ वृथा हा की !
एकही न पाकळी दवडली तुम्ही दिल्यापैकी !''
असे बोलूनी त्याच पावली आत जाय रमणी
क्षणात घेऊनी ये बाहेरी कसलीशी बरणी
म्हणे, ''पहा मी यात टाकले ते तुमचे गेंद,
आणि बनवला तुमच्यासाठी इतुका गुलकंद !''
क्षणैक दिसले तारांगण त्या - परी शांत झाला,
तसाच बरणी खांद्यावरती घेऊनीया गेला
''प्रेमापायी भरला'' बोले, ''भुर्दंड न थोडा !
प्रेमलाभ नच ! गुलकंद तरी कशास हा दवडा ?''

ही कविता म्हणजे प्रेमवेड्या तरूणांची छानपैकी टर उडवलेली आहे. ती एक हास्यकथाच वाटते. प्रेयसीला सलग सात महिने (न कंटाळता) प्रियकर दररोज एक गुलाबाचे फूल आणून देत असतो. ती त्याला एकही दिवस प्रतिसाद देत नाही. परंतु फूल मात्र स्वीकारत असते. अखेरीस तो जेव्हा तिला 'ही फुले वायाच गेली का?' असे विचारतो, तेव्हा ती त्याच्या हातावर त्या फुलांपासून केलेल्या गुलकंदाची बरणी ठेवते.

वास्तविक ते पाहून कुणालाही चक्करच आली असती. पण अत्र्यांचा हा प्रियकर महाबेरकी आणि व्यवहारी आहे. तो विचार करतो; 'प्रेम नाही तर नाही, पण हा गुलकंद तरी का सोडा?'

सात महिने तिच्यामागे वेडा झालेला हा प्रियकर वाटतो तेवढा बावळट आणि पागल नाही; किंवा तसे असू नये; असेच अत्र्यांना सुचवायचे असावे. प्रेम करावे पण ते शहाणे असावे असा संदेश हा गुलकंद देऊन जातो.

सौ. जयश्री नातू
मोबाईल : ९६५७०३२५२७ jayashrinatu@gmail.com